# डोळ्यांच्या अंतरंगात

डोळे हसतात, डोळे रडतात
डोळे संवादही करतात हृदयाशी
डोळे लाजतात, डोळे भिडतात
डोळे रागवतातही कधी कधी ।।धृ।।

कृतज्ञतेचा भाव असो
वात्सल्याची अमृतधार असो
किंवा प्रेमाचा उत्सव असो
तोही उमटतो डोळ्यांच्या अंतरंगातच ।।१।।

असे हे डोळे साक्षीदार असतात
तेच नक्षीही रेखाटतात
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर
नजरबंद करतात अनेक घटना
म्हणूनच त्याला मनाची खिडकी म्हणतात
हृदयातल्या भावभावना डोळ्यातून उमलतात
पापणी थोडी थरथरली की
हळुवारपणे ओघळतात ।।२।।

जीवनाचे अविभाज्य घटक असणारे
आयुष्यात शेवटपणे साथ देणारे डोळे
मृत्युनंतरही जिवंत असतात
नव्हे अधिक शक्तीमान होतात.
कारण मिटल्या डोळ्यांत दडलाय
''जगतसूर्य'' दृष्टीचा
तोच प्रकाशमान करतो
दोन अंध बांधवांना
उजळून टाकतो जीवनयात्रा त्यांची
म्हणूनच विनंती आपल्याला
मरणोत्तर नेत्रदानाची ।।३।।

चला करु या संकल्प नेत्रदानाचा
नेत्रहीनाच्या जीवनात दृष्टीरंग भरण्याचा
त्यांच्या नेत्रज्योती प्रज्वलित करु या
नजरेचे मंगल तोरण बांधू या...
मानवतेचा मंत्र जपत
मिटल्या डोळ्यातला ''सूर्य''
दान करु या
तो मावळल्यापूर्वी !

–डॉ.सौ.सुधा कांकरिया

साईसूर्य नेत्रसेवा
संशोधन आणि प्रशिक्षण